4 APR 2017 सकाळ

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रश्न सोडविण्यासाठी ज्ञान वापरा

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : टेकफेस्ट २०१७ स्पर्धेचा समारोप

कोल्हापूर, ता. ३ : 'अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी रोजच्या आयुष्यातील प्रश्न डोळसपणे समजून घेऊन त्यावर ठोस उपाय शोधण्याकरिता आपल्या अर्जित ज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित टेकफेस्ट २०१७ प्रकल्प स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताली असणाऱ्या अनेक लहान समस्यांकडेही संशोधनात्मक नजरेने पाहावे. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा या समस्यांवर उपाययोजना शोधण्याकरिता अधिक कल्पकतेने वापर करावा; मात्र प्रकल्पांच्या माध्यमातून केलेले हे उपयोजन लादलेले नसून स्वयंप्रेरित असले पाहिजे.''

एक विद्यार्थी - एक नवकल्पना या सूत्राप्रमाणे केल्यास अधिविभागाचे एक स्वतंत्र संशोधन भांडार लवकरच उभे राहील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी स्पर्धेचा हेतू विषद केला. विद्यार्थ्यांच्या संशोधकतेला प्रोत्साहन देण्याकरिता विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात या टेकफेस्टचे तीन गटांत आयोजन केले होते. यामध्ये अधिविभागाच्या तृतीय वर्ष, अंतिम वर्ष बी.टेक. व एम.टेक. च्या विद्यार्थ्यांनी या वर्षी केलेल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण झाले. पदव्युत्तर स्तराबरोबरच पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी संशोधनात रुची घेऊन आपले योगदान द्यावे, असेही ते म्हणाले. मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेट्रॉनिकस अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, केमिकल, फूड टेक्नॉलॉजी व एनर्जी टेक्नॉलॉजी या शाखांमधील प्रकल्पांचे सादरीकरण झाले. वर्किंग मॉडेल, लाइव डेमॉन्स्ट्रेशन, पोस्टरच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांचे वैज्ञानिक विचार, नवकल्पकता, संशोधन पद्धती आदी मुद्द्यांवर परीक्षकांनी मूल्यांकन केले. डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 APR 2017
तरुण भारत

# 'नेट-सेट'वर गुरुवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण केंद्रात २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील एम.ए. व एम.कॉमच्या विद्यार्थ्यांसाठी 'नेट-सेट परीक्षा तयारी' या विषयावर कार्यशाळा घेण्यात येणार आहे. गुरुवार ६ रोजी दूर शिक्षण केंद्रात सकाळी १० वाजता या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. या कार्यशाळेत डॉ. गजानन राशिनकर, प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, प्रा. डॉ. एम. एस. पदमीनी, आदी प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. या संबंधी डॉ कृष्णात पाटील, डॉ. विद्यानंद खंडागळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन दूरशिक्षणचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे व उपकुलसचिव डॉ. सोनजे यांनी केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 APR 2017
सकाळ

# मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण, विस्तार कार्य विभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीतर्फे मोडी लिपी वाचन, लेखन, प्राथमिक प्रगत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे. विद्यापीठ हायस्कूलमध्ये सहा एप्रिल ते आठ मे कालावधीत सायंकाळी पाच ते सात वेळेत हा वर्ग घेण्यात येईल. शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त प्रमाणपत्र प्रशिक्षण अभ्यासक्रमांतर्गत वर्गाचे आयोजन केले असून इच्छुकांनी उदयसिंह राजेयादव, वसंत सिंघण यांच्याशी संपर्क साधावा.